सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६७ | मंगळवार, दि. १० मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


## आजचे अभीष्टचिंतन





**श्री. रामचंद्र उपासनी**
निवृत्त नायब तहसीलदार



**श्री. अशोक करस्कर**
निवृत्त मुख्याध्यापक



**श्री. किरण सूर्यवंशी**
अध्यक्ष- संभाजी ब्रिगेड



**श्री. रवींद्र मोरे**
पत्रकार

# गॅस सिलिंडरच्या बुकिंग प्रक्रियेत मोठा बदल

## दुसरे सिलिंडर बुक करण्यापूर्वी पाहा नवे नियम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जागतिक परिस्थिती पाहता घरगुती गॅस सिलिंडरच्या बुकिंगशी संबंधित नियमात बदल करण्यात आले आहेत. आता बुकिंगची वेळ १५ दिवसांनी वाढवून २१ दिवसांपर्यंत करण्यात आली आहे. म्हणजेच आता एक सिलिंडर मिळाल्यानंतर दुसरे सिलिंडर डिलिव्हरीदरम्यान २१ दिवसांचे अंतर असेल.



एजन्सीचे सॉफ्टवेअर तातडीने अपडेट करण्यात आले आहे. बुकिंगची पद्धत आधीप्रमाणेच असेल. ग्राहक सिलिंडर मिळताच पुढील बुकिंग करू शकतात.

**वर्षाला १५ सिलिंडर खरेदी करण्याची परवानगी...**

तेल कंपन्यांची घरगुती गॅस सिलिंडरसाठी आधीच काही नियम तयार केले आहेत. ज्यानुसार प्रत्येक ग्राहकाला वर्षाला १२ सबसिडीचे सिलिंडर मिळू शकतात. याशिवाय ३ सिलिंडर सबसिडीशिवाय घेता येऊ शकते. याप्रकारे १ एप्रिल ते ३१ मार्च दरम्यान एक गॅस कनेक्शनवर एकूण १५ सिलिंडर खरेदी केले जाऊ शकतात.

**२४ तासांत सिलिंडर डिलिव्हरीचे नियम**

तेल कंपन्यांनी बुकिंग केल्यानंतर २४ तासांच्या आत सिलिंडर पोहोचविणे बंधनकारक केले आहे. यामुळे ग्राहकांची मोठी सोय होते.

**दिल्ली आणि मुंबईत सिलिंडरच्या नव्या किमती...**

दिल्लीत १९ किलच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत ७ मार्च २०२६ पासून ११५ रुपयांनी वाढविण्यात आली आहे. आता दिल्लीत हे सिलिंडर १८८३ रुपयांना मिळेल. ही वाढ एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या वाढीनंतर करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मुंबईत १९ किलोचे व्यावसायिक एलपीजी सिलिंडर आता १८३५ रुपयांना मिळेल.

**आता दुसरे सिलिंडर २१ दिवसांनंतर मिळणार**

आता नवा नियम लागू करण्यात आला आहे. यानुसार दुसरे सिलिंडर पहिले सिलिंडर मिळाल्याच्या २१ दिवसांनंतर मिळू शकेल. यासाठी एजन्सीच्या सॉफ्टवेअरमध्ये लॉक देण्यात आला आहे. सध्या तरी सिलिंडरची कमतरता नाही. त्यामुळे ग्राहकांनी चिंता करण्याचे कारण नाही. सर्वांना पुरेसे सिलिंडर मिळतील. या आठवड्यातच बॉटलिंग प्लांट रविवारीही काम करतील. जेणे करून पुरवठ्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.

## लाडकी बहीण होणार 'लखपती'

# बिनव्याजी कर्ज आणि व्यवसायाची संधी..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य सरकारने महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' आता केवळ दरमहा आर्थिक मदतीपुरती मर्यादित राहणार नाही. या योजनेला अधिक व्यापक स्वरूप देत, महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी राज्य सरकारने एक 'मास्टरप्लॅन' तयार केला आहे. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेच्या माध्यमातून महिलांना व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याची मोठी घोषणा केली आहे.

**'नारी शक्ती संगम'**

भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या प्रांगणात आयोजित 'विकसित भारत नारी शक्ती संगम' या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली आहे. त्यांनी स्पष्ट केले, की जगातील विकसित देशांच्या प्रगतीचा पाया हा तिथल्या महिलांना मिळालेल्या जबाबदाऱ्या आणि संधींवर आधारलेला आहे. भारत लवकरच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याचे स्वप्न पाहत असताना, त्यात महिलांचा सहभाग मोलाचा ठरणार आहे.

## मुख्यमंत्र्यांनी मांडला मेगा प्लॅन...!!




**विनाहमी कर्ज :** मुंबई बँकेच्या माध्यमातून महिलांना कोणताही जामीन किंवा हमी न देता विविध व्यवसायांसाठी कर्ज दिले जाईल.

**बिनव्याजी योजना :** हे कर्ज पूर्णपणे बिनव्याजी असणार आहे, जेणेकरून महिलांवर व्याजाचा बोजा पडणार नाही.

**परतफेडीची अनोखी पद्धत :** या कर्जाच्या परतफेडीसाठी महिलांना खिशातून पैसे देण्याची गरज भासणार नाही. 'लाडकी बहीण' योजनेंतर्गत मिळणारी मासिक आर्थिक मदतच या कर्जाच्या हप्त्यांसाठी वापरली जाईल.

**'उमेद' आणि 'उमेद मॉल'च्या माध्यमातून हक्काची बाजारपेठ**

महिलांनी केवळ वस्तू तयार करू नयेत, तर त्या विकण्यासाठी त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी 'उमेद' उपक्रमाची व्याप्ती वाढवण्यात येत आहे.

**जिल्हानिहाय उमेद मॉल :** प्रत्येक जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारले जातील, जिथे महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना थेट बाजारपेठ मिळेल.

**कॉर्पोरेट कंपन्यांना टक्कर :** महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तूंना योग्य ब्रँडिंग मिळाल्यास त्या मोठ्या खासगी कंपन्यांशीही यशस्वी स्पर्धा करू शकतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**महिलांचा प्रामाणिकपणा : ९९ टक्के कर्ज परतफेडीचा दर**

ना. देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महिलांच्या आर्थिक शिस्तीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, की " सर्वसाधारण कर्ज योजनांमध्ये परतफेडीचे प्रमाण साधारण ५० टक्क्यांच्या आसपास असते. मात्र, महिलांच्या बचतगटांना दिलेल्या कर्जाची परतफेड करण्याचे प्रमाण ९९ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महिलांमध्ये उत्तम आर्थिक व्यवस्थापनाची उपजत क्षमता असते, हेच यातून सिद्ध होते."

**'लाडकी बहीण' योजनेचे इतर योजनांशी 'लिंकिंग'**

केवळ १५०० रुपये महिना देऊन महिलांचे सक्षमीकरण पूर्ण होणार नाही, हे ओळखून सरकारने या योजनेला इतर शासकीय योजनांशी जोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



## पक्ष्यांची ओळख

# कोळशासारखा काळा कोतवाल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : वाचक मित्रांनो, सोमवार, दि. ९ मार्चपासून ' भारतीय पक्ष्यांची ओळख ' हे सदर दररोज सुरू करीत आहोत. भारतातील नानाविध पक्ष्यांची माहिती व त्यांचे वैशिष्ट्ये याबाबत थोडक्यात माहिती जाणून घेऊयात.**

**नाव :** कोतवाल drongo
**रंग :** कोळशा सारखा काळा
**चोच :** लहान अणकुचिदार
**डोळे :** लालसर
**आकार :** ८९ इंच
**शेपूट :** दुभंगलेली माशा सारखी
**खाद्य :** पिका वरील किडे,त्यामुळे शेतकऱ्यांचा मित्र
हवेत झेप घेऊन किडे , टोळ, मधमाशा खातो.गायी म्हशींच्या पाठीवर बसून शेतात भक्ष शोधतो.
**अंडी :** मादी एप्रील ते जून मध्ये ३४ अंडी घालते.नर व मादी अंड्यांचे रक्षण करतात. अंड्यांवर भुरकट डाग दिसतात
**वैशिष्ट्ये :** भारतभर सापडतो,अत्यंत चपळ, जोडीने राहतो, विजेच्या तारांवर बसून ऊन खातो.नर मादी दिसायला एक सारखे असतात.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी, निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर**

## दिनविशेष
१० मार्च

- युरेनसला शनीच्या सारखे कडा असल्याचे आढळून आले.
- रवी शास्त्री यांना भारतीय क्रिकेट संघाकडून चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्सचा किताब देण्यात आला.
- भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंदने लिनरेस सुपर ग्रँडमास्टर बुद्धिबळ स्पर्धा जिंकली
- भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्यात आले





अमळनेर : महिला दिनानिमित्त अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या कार्यक्रमप्रसंगी प्रा. डॉ. नयना नवसारीकर, अॅड. भारती अग्रवाल, सौ. वनश्री अमृतकर, सौ. उर्मिला अग्रवाल, सौ. कपिला मुठे आदी. दुसऱ्या छायाचित्रात सत्कारप्रसंगी उपस्थित द्रौ. रा. कन्या शाळेतील शिक्षिका.

# महिलांना अधिकारासोबत हवा सन्मान!

## प्रा. डॉ. नयना नवसारीकर; ग्राहक पंचायतीतर्फे जागतिक महिलादिन उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महिलांना सहानुभूती नको. समान हक्क व अधिकारासोबतच सन्मान आदर हवा. ही जबाबदारी पुरुषांनी पार पाडायला हवी, असे प्रतिपादन प्रा. डॉ. नयना बाविस्कर यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त रविवार, दि. ८ मार्च रोजी येथील अखिल भारतीय ग्राहक पंचायतीतर्फे अध्यक्षा सौ. स्मिता चंद्रात्रे यांच्या निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. प्रांत महिला आयामप्रमुख अॅड. भारती अग्रवाल, सौ. वनश्री अमृतकर, सौ. उर्मिला अग्रवाल, सौ. कपिला मुठे, सौ. अंजू ढवळे, सौ. मेहराज हुसेन, मकसूद बोहरी, सतीश देशमुख, विजय शक्ला, सुनील वाघ, नरेंद्र बाळू पाटील, भाऊसाहेब देशमुख, गोकुळ पाटील, निवृत्त तहसीलदार उपासनी उपस्थित होते.

प्रा. डॉ. नवसारीकर पुढे म्हणाल्या, की स्त्री ही अनेक प्रकारच्या भूमिका पार पार पडत असते. प्रथम मुलगी भगिनी, पत्नी नंतर अनंत काळाकरता माता असते. स्त्री ही किती मोठ्या पदावर गेली तरी चूल-मुल, घरकाम, स्वयंपाक, घर नीटनेटके ठेवणे याबाबत राब राबत असते. आजच्या प्रगत जगात परिस्थितीनुसार हा थोडा बदल आवश्यक आहे. पुरुषांनीही तो सहजपणे स्वीकारावा व पुरुषांनीही घर कामात सहभाग घ्यावा व पती-पत्नी दोघांनी मिळून घर संसार आनंदाने चालववा.

प्रारंभी ग्राहकतीर्थ (स्व.) बिंदू माधव जोशी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या व अमळनेर महिला मंचच्या अध्यक्षा (स्व.) डॉ. अपर्णा मुठे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कु. भार्गवी चंद्रशेखर पाटील हिने मनोगत व्यक्त केले. अॅड. भारती अग्रवाल यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सौ. कपिला मुठे यांनी सूत्रसंचालन केले. सौ. स्मिता चंद्रात्रे यांनी आभार मानले.

**द्रौ. रा. कन्या शाळेत शिक्षिकांचा सत्कार**

येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित द्रौ. रा. कन्या शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त मुख्याध्यापिका, महिला शिक्षक, खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी अमळनेर माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, माजी उपनगराध्यक्ष अनिल महाजन, शिक्षण सभापती नाविद शेख, नंदुरबारचे नगरसेवक गौरव चौधरी, ज्येष्ठ शिक्षक साखरलाल माळी, ज्येष्ठ शिक्षक एस. एस. वाघ, पर्यवेक्षक एस. पी. वाघ, ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती आर. एस. सोनवणे उपस्थित होते. महिला शिक्षिकांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन सन्मानपत्र व बुके देऊन सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडू सुकेशनी सपकाळे, समिक्षा बिऱ्हाडे यांचाही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

संपादकीय

# यंदाचा उन्हाळा दुहेरी चटके देणारा

आखाती देशांतील युद्धाचा चटका बसत असताना आता उन्हाळ्याच्या कडक झळाही जाणवू लागल्या आहेत. या युद्धाचे पर्यावरणाच्या दृष्टीने होणारे दुष्परिणाम आहेतच. परंतु आखाती देशांतून मिळणाऱ्या इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याने अनेक वस्तूंची टंचाई निर्माण होईल. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे यावेळचा उन्हाळा हा दुहेरी चटका देणारा ठरेल असेच एकूण वातावरण आहे. पुढच्या आठ–पंधरा दिवसांत जरी युद्ध थांबले तरी सगळी परिस्थिती पूर्ववत व्हायला पुढचा महिना–दीड महिना लागू शकतो. इराण आणि अन्य अरब देशांचे दुखावलेले संबंध हे भविष्यकाळात कितपत पूर्ववत होतील, याबद्दल शंका आहे. प्रामुख्याने या सगळ्या अरब देशांचे अर्थकारण हे इंधन उत्पादन आणि तत्संबंधीचा व्यापार याच्याशी निगडीत असते. भारतासारखा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश या देशांकडूनच मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतो. आणि त्याच्या मोबदल्यात अन्य कृषी आणि औद्योगिक उत्पादनांचा व्यापारही करीत असतो. परंतु आता विस्कटलेली सगळी घडी पूर्ववत होता होता बराच कालावधी जाईल. त्याचा परिणाम म्हणूनच भारतात बऱ्याच वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने युद्ध लक्षात घेऊनच आपला तेलसाठा तयार ठेवला होता. परंतु देशभरातील एकूण इंधनाची मागणी आणि पुरवठ्याचे प्रमाण लक्षात घेतले तर हा साठा फार काळ टिकणारा नाही. स्वाभाविकपणे इंधनाचा तुटवडा हा इंधनाच्या किंमतवाढीमध्ये होतो आणि इंधन किंमतवाढीचे परिणाम हे अगदी जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीपर्यंत पोहोचतात. आज तशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. भारताला जरी रशियाकडून काही प्रमाणात तेल मिळत असले, तरी एकूण गरजेचा विचार केला तर हा सगळा इंधन पुरवठा कायम ठेवणे म्हणजेच विशिष्ट कालावधीत विशिष्ट साठा तयार ठेवणे भारताला आवश्यक ठरते. यातील लक्षात घेण्यासारखा भाग असा आहे, की इराणने इतर सगळ्याच अरब देशांवर हल्ले केल्याने तेथील परिस्थिती अस्थित झालेली आहे.

उन्हाळा म्हटल्यानंतर पाणीटंचाई हा प्रकार कायमचा ठरलेला असतो. व्यापक अर्थाने पाहिले तर पाणीसुद्धा व्यक्ती आणि समाजाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठीचे महत्त्वपूर्ण इंधन ठरते. युद्धाच्या निमित्ताने काही वस्तूंची टंचाई निर्माण होत असताना राज्याच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचे प्रश्न आतापासूनच निर्माण होऊ लागले आहेत. खानदेश, मराठवाडा, विदर्भाचा काही भाग, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे हे पाणीटंचाईसदृश आहेत. उत्तर महाराष्ट्रात जळगावला आतापासूनच एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. हे तापमान नेहमीपेक्षा जास्त असेल, असाही वेधशाळांचा कयास आहे. स्वाभाविकपणे पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. खरेतर यावर्षी सगळीकडे चांगला पाऊस झाला. नद्या, धरणे, ओसंडून वाहत होते. परंतु पाण्याची वाढती मागणी, शिवाय पाण्याचा अपव्यय या कारणांनी हे परंपरागत पाणीसाठे पाण्याची वाढती गरज भागवू शकत नाहीत. यातील एक वेगळाच प्रश्न म्हणजे वाढत्या तापमानाने धरणे किंवा जलसाठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होते आणि पाण्याची पातळी खाली जात राहते. याचा अर्थ पाणी साठवण्याच्या आणखी वेगळ्या पद्धती विकसित करणे आवश्यक ठरते. बऱ्याच ठिकाणी जलसिंचनाच्या योजना पूर्णत्वाला जाऊ शकलेल्या नाहीत. अगदी जलयुक्त शिवारसारख्या योजनांचाही प्रभाव पडू शकलेला नाही. अशा एक ना अनेक कारणांमुळे पाणीसाठा खालावत जातो. सरकारकडून दरवर्षीप्रमाणे टँकरच्या मार्फत ठिकठिकाणी पाणी पुरविलेही जाते. परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला आहे. वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण मात्र त्या प्रमाणात जलसिंचनाच्या सोयी–सुविधा पूर्ण केल्या जात नाहीत. विशेषतः ग्रामीण किंवा निमशहरी भागाकडे दुर्लक्ष होते. जुने प्रकल्पही वेळेत पूर्ण होत नाहीत. म्हणूनच भरपूर पाऊस पडूनही पाण्याची टंचाई भेडसावत राहते.

दरवर्षीचा हा पाणीटंचाईचा चटका आदिवासी भागासह ग्रामीण महाराष्ट्राला सहन करावा लागतो. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारकडून मोठ्या महानगरांचाच प्राधान्याने विचार होतो. याची अगदी ताजी दोन ठळक उदाहरणे म्हणजे मुंबईचा पाणीपुरवठा अखंड राहावा म्हणून दोन नव्या योजना अमलात आणल्या जात आहेत. त्याच्यावर जवळपास १५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत, तर पुढच्या पाच वर्षांत येऊ घातलेल्या तिसऱ्या मुंबईचा विचार करून आतापासूनच पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजना हाती घेतल्या आहेत. त्याच्या प्राथमिक कामासाठी दहा हजार कोटी रुपये मंजुरही झालेले आहेत. याच्या उलट आदिवासी किंवा ग्रामीण भागात छोट्या छोट्या पाणीयोजनासुद्धा निधीच्या टंचाईचे कारण देऊन पूर्णत्वाला जाऊ शकत नाहीत. याचा अर्थ पाणी पुरवठ्याबाबत नियोजनपूर्वक धोरण राबवले जात नाही. किंबहुना हाती घेतलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पांचा पाठपुरावा होत नाही. अगदी महाराष्ट्राच्या जिल्हा ठिकाणीसुद्धा उन्हाळाच नव्हे तर वर्षभर दोन ते तीन दिवसाआड एकदाच पाणीपुरवठा केला जातो. आज पूर्वीइतका दुष्काळाचा प्रभाव जरी जाणवत नसला तरी गावागावातील पाणीटंचाईची समस्या कायम असल्याचेच म्हणावे लागते. भरपूर पाऊस पडूनही ही परिस्थिती निर्माण होत असेल तर पावसाप्रमाणे नियोजनही गैरकारभाराच्या महापुरात वाहून जाते असे म्हणावे लागेल. यंदाची परिस्थिती लक्षात घेतली तर पाण्यासाठीदेखील लोकांना युद्धाचाच सामना करावा लागतो आहे.

# विजेती टीम इंडिया पुन्हा निळ्या जर्सीत केव्हा दिसणार?

## जाणून घ्या २०२६ मधील वेळापत्रक; संजू पुन्हा इंग्लंड, किवींना झोडणार!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




भारतीय संघाने रविवारी अहमदाबाच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर ऐतिहासिक ट्वेंटी– २० वर्ल्ड कप जिंकला. न्यूझीलंडवर ९६ धावांनी विजय मिळवून भारताने वर्ल्ड कप उंचावला आणि आता टीम इंडिया पुन्हा निळ्या जर्सीत केव्हा दिसणार, याची आता उत्सुकता आहे.

२८ मार्चपासून इंडियन प्रीमिअर लीग सुरू होणार आहे आणि त्यामुळे टीम इंडियाचे शिलेदार त्यांच्या त्यांच्या फ्रँचायझीकडून खेळताना दिसतील. त्यामुळे ३१ मे पर्यंत तरी भारतीय खेळाडू एकत्रित निळ्या जर्सीत दिसण्याची शक्यता नाहीच. मात्र, जूननंतर भारतीय संघ तगड्या प्रतिस्पर्धींना भिडायला सज्ज होणार आहे. ट्वेंटी– २० वर्ल्ड कप हा खऱ्या अर्थाने संजू सॅमसनचा होता. फक्त ६ सामन्यांत त्याने ३२१ धावा करताना प्लेअर ऑफ दी टुर्नामेंटचा पुरस्कार जिंकला. संघ संकटात असताना संजूला संधी मिळाली आणि त्याने त्याच्यावरील विश्वास सार्थ ठरवला. विंडीजविरुद्ध नाबाद ९७, इंग्लंडविरुद्ध (उपांत्य फेरी) ८९ आणि न्यूझीलंडविरुद्ध फायनलमध्ये ८९ धावांची अविस्मरणीय खेळी त्याने साकारली. तो सहज शतक झळकावू शकला असता. मात्र, त्याने वैयक्तिक शतकापेक्षा संघाच्या हिताचा विचार केला. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीही याच गोष्टीसाठी खेळाडूंचे कौतुक केले.

**भारतीय संघाचे पुढील वेळापत्रक**

**अफगणीस्तान दौरा**
**६ ते १० जून –** एकमेव कसोटी, न्यू चंदिगढ
**१४ जून –** पहिली वन डे– धर्मशाला
**१७ जून –** दुसरी वन डे– लखनौ
**२० जून –** तिसरी वन डे– चेन्नई

**इग्लंड दौरा**
**१ जुलै –** पहिली ट्वेंटी– २० – चेस्टर ले स्ट्रीट
**४ जुलै –** दुसरी ट्वेंटी–२० – मँचेस्टर
**७ जुलै –** तिसरी ट्वेंटी– २० – नॉटिंगहॅम
**९ जुलै –** चौथी ट्वेंटी– २० – ब्रिस्टॉल
**११ जुलै –** पाचवी ट्वेंटी– २० – साऊथहॅम्पट
**१४ जुलै –** पहिली वन डे – बर्मिंगहॅम
**१६ जुलै –** दुसरी वन डे – कार्डीफ
**१९ जुलै –** तिसरी वन डे – लंडन

**ऑगस्ट २०२६**
२ कसोटी सामने वि. श्रीलंका ( अवे)

**सप्टेंबर – ऑक्टोबर २०२६**
३ ट्वेंटी–२० वि. अफगाणिस्तान ( अवे)

**आशियाई स्पर्धा**
३ वन डे वि. वेस्ट इंडिज ( होम)
५ ट्वेंटी– २० वि. वेस्ट इंडिज ( होम)

**नोव्हेंबर २०२६**
२ कसोटी वि. न्यूझीलंड ( अवे)
३ वन डे वि. न्यूझीलंड ( अवे)
५ ट्वेंटी– २० वि. न्यूझीलंड ( अवे )

**डिसेंबर २०२६**
३ वन डे वि. श्रीलंका (होम)
५ ट्वेंटी–२० वि. श्रीलंका (होम)

# कामगार– ठेकेदार पीएफ, वेतनावरून आले आमनेसामने

## समन्वयाने मार्ग काढण्याचे मुख्याधिकाऱ्यांचे निर्देश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार आणि कामगार यांच्यात वेतन, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि सुविधा यावरून वाद सुरू आहेत. याबाबत सोमवार, दि. ९ मार्च रोजी दुपारी ठेकेदार व कामगारांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत समन्वयाने तोडगा काढावा, असे निर्देश मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी दिले आहेत.


*अमळनेर : कामगार– ठेकेदारांच्या संयुक्त बैठकीस मार्गदर्शन करताना मुख्याधिकारी गणेश शिंदे.*

घनकचरा व्यवस्थापन ठेकेदाराने २०२२ पासून कामगारांना पीएफ दिलेला नाही. किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देत नाही. वेतन बँक खात्यावर न देता साध्या वहीवर पेन्सिलीने रक्कम लिहून पगार देतो. त्यानंतर खोडून टाकतो. पीएफ दुसऱ्याच्याच नावाने जमा होतो. कामगारांना आरोग्यसाठी लागणारे किट देत नाही, असे अनेक आरोप करत मेहुल बिऱ्हाडे यांनी कामगारांची बाजू मांडली. ठेकेदार पवार आणि मुकादम खलील शहा यांनी सांगितले, की कामगारांनीच आम्हाला पीएफ रोखीने द्यायला सांगितला होता. कामगार तीनच तास काम करतात. मी कमी दराने ठेका भरला आहे. चार वर्षांपासून मुदत वाढवून मला त्याच दराने काम करायला लावत आहेत. माझे बिल अडकले आहे, तरी मी नियमित वेतन करतो. त्यावर कामगारांनी आक्रमक होत कराराप्रमाणे किमान वेतन, खात्यावर वेतन जमा झाले पाहिजे व २०२२ पासून पीएफ जमा झाला पाहिजे, अशी मागणी केली. त्यावर दोन्ही पक्षांची समजूत घालून मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी सामंजस्याने तोडगा काढावा. दोघांनी दोन–दोन पावले सरकावीत आणि शहराला वेठीस धरू नये अन्यथा कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, असा कडक इशारा दिला. त्यानंतर दोन्ही गटांनी एकत्र चर्चा करण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीस आरोग्य निरीक्षक किरण कंडारे, आरोग्य निरीक्षक संतोष जाधव, घनकचरा ठेकेदार व कामगार उपस्थित होते.



# सोन्याच्या दरात घसरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या अमेरिका व इराण यांच्यातील युद्धाचा जळगावच्या सराफ बाजारातील सोन्या आणि चांदीच्या दरावर मोठा परिणाम झाला आहे. पण आज सोन्याच्या दरात मोठी घसरण झाल्याचे समोर आले आहे. २८ फेब्रुवारी रोजी सोन्याचे दर विना जीएसटी १ लाख ६८ हजार रुपये होते. तर आज सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सोन्याचे दर हे विना जीएसटी १ लाख ६० हजार रुपयांवर आले आहेत. दहा दिवसांपूर्वी चांदीचे दर २ लाख ९० हजारांवर होते. तेच दर आज २ लाख ६६ हजार रुपयांवर आले आहेत.

सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी १० ग्रॅम सोन्याचे दर जीएसटीसह १ लाख ६४ हजार ८०० रुपयांवर पोहोचले आहेत. तर चांदीचे दर जीएसटीसह २ लाख ७३ हजार ९८० रुपयांवर पोहोचले आहेत. सोन्याच्या आणि चांदीच्या दरात चढउतार होत असल्याने ग्राहक वेट अ‍ॅण्ड वॉचच्या भूमिकेत असल्यामुळे ग्राहकांची संख्या मंदावली आहे.

# स्पीड पोस्ट शुल्कात दहा टक्के सवलत

## टपाल विभागाकडून विद्यार्थ्यांना दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षण आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुण पिढीला मोठा आर्थिक दिलासा देण्यासाठी भारतीय टपाल विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शैक्षणिक संस्था किंवा सरकारी भरती संस्थांना स्पीड पोस्टद्वारे कागदपत्रे पाठवणाऱ्या विद्यार्थ्यांना मूळ शुल्कात १० टक्के विशेष सवलत दिली जाणार आहे. एमपीएससी, युपीएससी, एसएससी, नेट–सेट यांसारख्या स्पर्धा परीक्षांचे अर्ज आणि विविध शैक्षणिक संस्थांत कागदपत्रे पाठवताना विद्यार्थ्यांना मोठा खर्च करावा लागतो. खासगी कुरिअर चालकांकडून कोणतीही सवलत मिळत नसल्याने विद्यार्थ्यांची आर्थिक ओढाताण होते. टपाल विभागाच्या या निर्णयाने आता विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. बुकिंगच्या वेळी विद्यार्थ्याने आपले वैध विद्यार्थी ओळखपत्र मूळ प्रत, छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. टपालावर पाठवणाऱ्याचे नाव व ओळखपत्रावरील नाव एकच हवे. पाकिटाच्या दर्शनी भागावर स्टुडंट मेल असे लिहावे. सवलत केवळ पोस्ट ऑफिसच्या काउंटरवर प्रत्यक्ष बुकिंग करणाऱ्यांसाठीच राहील. शिक्षण, रोजगारासाठी धडपडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना एक मोठी मदत ठरणार आहे.

# जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर थकबाकी ६० कोटींवर

## बिलात सवलत देण्याची होतेय मागणी

अमळनेर : जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात परतीच्या पावसाने नुकसान झाले आहे. ओल्या दुष्काळी स्थितीचा मोठा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर झाला आहे. यामुळे सुमारे १ हजार ८०० ग्रामपंचायतींची करवसुली मोहीम ठप्प झाली आहे. थकबाकीचा आकडा तब्बल ६० कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे. अतिवृष्टीमुळे खरिपातील पिकांचे मोठे नुकसान झाले असून, शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याचे चित्र आहे. खान्देशातील प्रमुख पीक असलेल्या कापसाची विक्री ६ हजार ५०० ते ६ हजासर ८०० रुपये प्रति क्विंटल दराने झाली असून, उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा नफा अत्यल्प आहे. रब्बी हंगामातही ज्वारी आणि हरभऱ्याचे उत्पादन घटल्याने ग्रामस्थ व शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर, बँकांप्रमाणेच ग्रामपंचायतींनीही वसुलीतून सरसकट सूट द्यावी, अशी मागणी जिल्हाभरातून आता होऊ लागली आहे.

# डोळ्यांना सुरक्षित असणारा गॉगल वापरणे फायदेशीर

## नेत्ररोगतज्ज्ञांचा सल्ला; उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी घेण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उन्हाळ्यात प्रत्येकाच्याच डोळ्यांवर गॉगल्स दिसून येतात. मात्र, डोळ्याच्या दृष्टीने सुरक्षित नसणारा गॉगल्स वापरणे धोकेदायक आहे. या गॉगल्समधून अल्ट्राव्हायलेट अर्थात अतिनील सूर्यकिरणांपासून बचाव होत नाही. यासाठी उच्चदर्जाचे काच असलेलेच गॉगल्स वापरणे फायदेशीर आहे, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विशेषतः उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी घेण्याचे



आवाहनही त्यांनी केले आहे.

हलक्या दर्जाचे गॉगल्स वापरल्याने बुबुळ व दृष्टिपटल (रेटिना) प्रभावित होऊन काही कालावधीनंतर दृष्टी कमी होण्याचा धोका असतो. त्यामुळे स्टैंडर्ड गॉगल नसला तरी चालेल. मात्र, डोळ्याच्या दृष्टीने चांगला असणाराच गॉगल्स वापरावा. तापमान दरवर्षीच उच्चांकी असते. परिणामी मार्चमध्येच उन्हाच्या झळा बसत असल्याचे दिसून येत आहे. अशा उन्हापासून संरक्षण करण्यासाठी डॉक्टरांकडून टोपी, गॉगल्स, दुपट्टा वापरण्याचा सल्ला देण्यात येत आहे. त्यामुळे उन्हाळ्याला सुरुवात होताच प्रत्येक रस्त्यावर गॉगल्स, टोपी, दुपट्टे, स्कार्फ, रुमाल विक्रीची दुकाने दिसून येतात. यात केवळ १९९ रुपयाला गॉगल्स असा बोर्डही लागलेला दिसून येत आहे. त्यामुळे बहुतांश जण सहज चांगला स्टैंडर्ड दिसेल असा गॉगल्स गॉगल्सच्या काचेची क्वालिटी कशी आहे, डोळ्याला फायदेशीर आहे की नाही, अतिनील सूर्यकिरणांपासून बचाव होतो की नाही हे बघत नसतात. मात्र, अशा गॉगल्समुळे डोळ्यांचे संरक्षण न होता धोका होण्याची शक्यता असते, असे नेत्ररोगतज्ज्ञांनी सांगितले.

**उन्हाळ्यात अशी घ्या काळजी**

भर उन्हात उघड्या डोळ्यांनी जाऊ नका. दिवसातून तीन वेळा डोळे थंड पाण्याने धुवा. भरपूर पाणी प्या, सकाळी व्यायाम करा, व्हिटॅमिन ए असलेल्या पदार्थांचे सेवन करा, कोल्ड्रिंकपेक्षा लिंबू पाणी, ताकाचे सेवन करा.

**गॉगल्स घेताना काळजी घ्यावी**

केवळ गडद रंगाचेच गॉगल्स उन्हापासून संरक्षण देतात हा समज चुकीचा आहे. अनेक वेळा महागडे असलेले गॉगल्सही अतिनील सूर्यकिरणांपासून शंभर टक्के बचाव करीत नाही. ते महागडे असतात ते त्याच्या फ्रेममुळे. त्यामुळे गॉगल्स घेताना शंभर टक्के यूव्ही प्रोटेक्शन असलेले गॉगल्सच वापरावेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# वडिलांचे अधुरे स्वप्न लेकीने केले पूर्ण!

## कळवणची कन्या डॉ. सायली पगार 'यूपीएससी'त देशात ८७ वी

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जिद्द, चिकाटी आणि योग्य नियोजनाच्या जोरावर कोणत्याही महागड्या शिकवणीशिवाय यूपीएससीच्या परीक्षेत हयश मिळवता येते, हे नाशिक जिल्ह्यातील कळवणच्या कन्येने सिद्ध केले आहे. डॉ. सायली पगार हिने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत, दुसऱ्याच प्रयत्नात देशात 87 वा क्रमांक पटकावला आहे. या यशासह तिने आयएएस पदाला गवसणी घातली आहे. या यशामुळे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

डॉ. सायली हिचे वडील भिका पगार हे 'भारतीय रिझर्व्ह बँक नोट मुद्रण लिमिटेड'मधून डेप्युटी जनरल मॅनेजर पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या तरुणपणी स्वतः प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. दोन वेळा 'एमपीएससी'च्या राज्य सेवा परीक्षेत मुलाखतीपर्यंत पोहोचूनही त्यांना अंतिम यशाने हुलकावणी दिली होती. वडिलांच्या मनातील हेच शल्य ओळखून सायलीने प्रशासकीय सेवेत जाण्याचा निश्चय केला आणि वडिलांचे स्वप्न तिने स्वतः सत्यात उतरवून दाखवले.

### वैद्यकीय पदवी अन् देशसेवेची ओढ

डॉ. सायली पगार हिने २०२४ मध्ये बंगळुरू येथून ७४ टक्के गुणांसह एमबीबीएस पदवी संपादन केली. वैद्यकीय क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असतानाही प्रशासकीय सेवेत करिअर करण्याची आवड असल्याने अत्यंत कठीण अशा यूपीएससी परीक्षेची निवड तिने केली. विशेष म्हणजे, पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यावर खचून न जाता नंतर तिने अधिक जोमाने या परीक्षेची तयारी केली. त्यासाठी कुठलाही प्रत्यक्ष क्लास न लावता घरूनच अभ्यास करण्यावर तिने भर दिला. आजच्या काळात स्पर्धा परीक्षेची तयारी म्हटले की, लाखो रुपये खर्च करून कोचिंग क्लास लावले जातात. मात्र, सायली हिने एमबीबीएस पदवीचा भाग म्हणून शासकीय रुग्णालयातील इंटर्नशिप आणि वैद्यकीय सेवा सांभाळत असताना घरुनच यूपीएससी परीक्षेचा अभ्यास सुरू ठेवला.

### ऑनलाइन मार्गदर्शन

मे २०२४ मध्ये पहिल्या प्रयत्नात यूपीएससीच्या पूर्व परीक्षेत अपयश आल्यानंतर मे २०२५ मध्ये दुसऱ्यांदा पूर्व परीक्षेला ती समोरे गेली. या परीक्षेत पात्र ठरल्यानंतर ऑगस्ट २०२५ मध्ये झालेल्या मुख्य परीक्षेत यश मिळाले. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेली मुलाखत सायली हिच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. अंतिम निकालात ८७ वी रँक मिळाल्याने तिला आयएएस संवर्ग मिळणे नक्की झाले आहे. मुख्य परीक्षेसाठी मेडिकल सायन्स हा तिचा ऑप्शनल विषय होता. मुख्य परीक्षेसाठी सायलीने ऑनलाइन मार्गदर्शनाची मदत घेतली. तसेच मुलाखतीसाठी बोलावणे आल्यावर पुणे आणि दिल्ली येथे सराव मुलाखती देऊन तयारी करवून घेतली. वडील भिका पगार यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्याशी होणाऱ्या गप्पांमधून प्रशासकीय सेवेत जाण्याची प्रेरणा मिळाली. चौफेर वाचन असेल तर कोणत्याही क्लासशिवाय परंतु, योग्य नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर यश मिळविता येते, असे डॉ. सायली पगार यांचे मत आहे.




# भारतीय क्रिकेटमधील जीवंत दंतकथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात काही नावे केवळ त्यांच्या आकडेवारीमुळे नव्हे, तर अदम्य इच्छाशक्तीमुळे अजरामर झाली आहेत. त्यापैकीच एक अग्रगण्य नाव म्हणजे नरीमन जमशेदजी ऊर्फ नरी कॉन्ट्रॅक्टर.

७ मार्च १९३४ रोजी गुजरातच्या गोध्रा रेल्वेस्थानकावर त्यांचा जन्म झाला. त्यांची आई दाहोदहून मुंबईला रेल्वेने प्रवास करत असताना प्रवासातच प्रसूती वेदना सुरू झाल्या आणि नरी यांचा जन्म झाला. मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीत घडलेल्या या डावखुऱ्या फलंदाजाने १९५२ मध्ये पदार्पणाच्याच प्रथम श्रेणी सामन्यात गुजरातकडून दोन्ही डावांत शतके (११३ आणि १०८ धावा) ठोकून देशांतर्गत क्रिकेटमध्ये खळबळ माजवून दिली होती. त्यांच्या एकूण प्रथम श्रेणी कारकिर्दीत त्यांनी १३८ सामन्यांत ८६११ धावा केल्या. ज्यात २२ शतकांचा समावेश होता. कसोटी क्रिकेटमध्येही ३१ सामन्यांत १६११ धावा करताना त्यांनी आपली छाप पाडली. त्यांची ही आकडेवारी केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून ती त्यांच्या साहसाची साक्ष देते.



नरी कॉन्ट्रॅक्टर यांच्या जिद्दीचे सर्वांत मोठे दर्शन घडले ते १९५९ च्या इंग्लंड दौऱ्यात. क्रिकेटची पंढरी मानल्या जाणाऱ्या 'लॉर्ड्स' मैदानावर इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ब्रायन स्टॅथमचा एक भेदक चेंडू त्यांच्या थेट छातीवर आदळला. या आघातामुळे त्यांच्या दोन बरगड्या मोडल्या. पण असह्य वेदना होत असतानाही हा पठ्ठ्या मैदान सोडून गेला नाही. मोडलेल्या बरगड्यांसह त्यांनी ८१ धावांची झुंजार खेळी साकारली, जी आजही क्रिकेटमधील शौर्याचे उत्तम उदाहरण मानली जाते. केवळ २६ व्या वर्षी भारताचे तत्कालीन सर्वांत तरुण कर्णधार होण्याचा मान मिळविणाऱ्या नरी यांच्या नेतृत्वाखाली भारताने १९६१-६२ मध्ये इंग्लंडविरुद्ध मालिका विजयही मिळविला. मात्र, १९६२ मध्ये बार्बाडोस येथे चार्ली ग्रिफिथचा बाउन्सर डोक्याला लागल्याने त्यांच्या कारकिर्दीला खीळ बसली. मृत्यूच्या दारातून परतलेल्या या खेळाडूने जिद्दीने पुन्हा घरगुती क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. आज वयाची नव्वदी ओलांडलेले नरी कॉन्ट्रॅक्टर हे भारतीय क्रिकेटमधील एक जीवंत दंतकथा आहेत.



# गाडीतून प्रवासावेळी काही जणांना उलटी का होते?


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्या वेळेस आपण गाडीतून प्रवास करताना गाडीचे आवरण पूर्ण बंद असते त्या वेळेस गाडीच्या आतील आवारातील ऑक्सिजनची कमतरता फार कमी प्रमाणात असते. ज्या वेळेस गाडी चालू असते त्या वेळेस आपल्या डोळ्यांना जलदगतीत चित्रे दिसतात. डोळ्यांकडून अशी सूचना नाकापासून ते कानापर्यंत पोहोचली जाते. अशा परिस्थितीत आपले कान वेगळ्याप्रकारे सक्रिय असतात त्यांना ते जाणवते. कानांमार्फत सूचना शरीरकडे पाठविली जाते. अशा घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे आपले कान, नाक, डोळे हे वेगळेपण अनुभवतात.

आतल्या हवेत त्यामुळे नाकाद्वारे वेगळा सुगंध जाणवतो. त्यामुळे शरीराला वेगळ्या गोष्टी जाणवतात. त्यातून आपल्याला उलटी होते. अशा वेळेस आपण काचेच्या शेजारीच बसावे. त्यामुळे योग्य तेवढा ऑक्सिजन आपणास मिळू शकतो. जेव्हा आपण दुचाकी गाडीने प्रवास करतो त्या वेळेस आपल्याला उलटी होत नाही. त्याचे कारण आपल्याला योग्य तेवढा ऑक्सिजन मिळतो.

# जब १० नवंबर को दिल्ली में रेड फोर्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



ब्लास्ट की घटना से हलचल मच गई, तो रिपोर्टों में शाहिदा परवीन गांगुली की मौजूदगी का भी उल्लेख किया गया। वे एक वरिष्ठ पुलिस अधिकारी हैं, जिन्हें जम्मू-कश्मीर में लंबे समय तक काउंटर-टेरर ऑपरेशनों में काम करने का अनुभव रहा है। वर्षों के दौरान उन्होंने फील्ड लीडरशिप और ऑपरेशनल अनुभव के लिए एक मजबूत प्रतिष्ठा हासिल की है।

पुंछ में एक साधारण परिवार में जन्मी शाहिदा ने अपने बचपन का समय उस दौर में बिताया जब क्षेत्र काफी अशांत था। उन्होंने कम उम्र में ही अपने पिता को खो दिया और उनका पालन-पोषण ऐसे माहौल में हुआ जो आतंकवाद और उग्रवाद से प्रभावित था। १९९४ में उन्होंने जम्मू-कश्मीर पुलिस में भर्ती के लिए आवेदन किया यह निर्णय उनके जीवन की दिशा तय करने वाला साबित हुआ। पुलिस बल में शामिल होने के बाद उन्होंने स्पेशल ऑपरेशंस ग्रुप में स्वयंसेवा के लिए आगे कदम बढ़ाया। यह इकाई उच्च-जोखिम वाले आतंकवाद-रोधी अभियानों के लिए जानी जाती है। १९९० के दशक के अंत और २००० के शुरुआती वर्षों में वे कई संवेदनशील जिलों में काउंटर-इंसर्जेंसी अभियानों से जुड़ी रहीं। समय के साथ उन्हें वीरता के लिए सम्मान भी मिला, जिसमें पुलिस मेडल फॉर गैलेंट्री शामिल है, जो उनके ऑपरेशनल योगदान को दर्शाता है।

आज वे दिल्ली में असिस्टेंट कमिश्नर ऑफ पुलिस के पद पर कार्यरत हैं। रेड फोर्ट की घटना-स्थल पर उनकी मौजूदगी इस बात को दर्शाती है कि महत्वपूर्ण जांचों के दौरान अनुभवी अधिकारियों को तैनात किया जाता है, जिसमें नेशनल इन्वेस्टिगेशन एजेंसी जैसी एजेंसियों के साथ समन्वय भी शामिल होता है। उनकी यात्रा संघर्षपूर्ण परिस्थितियों में विकसित हुई पेशेवर दृढ़ता को दर्शाती है। सुर्खियों से परे, यह भारत में उच्च-जोखिम वाली पुलिसिंग भूमिकाओं में महिलाओं की बढ़ती भागीदारी और बदलती भूमिका का भी प्रतीक है। उनका करियर इस बात की याद दिलाता है कि आतंकवाद-रोधी अभियान अनुशासन, अनुभव और संस्थागत प्रतिबद्धता की मांग करते हैं चाहे वह किसी भी लिंग का व्यक्ति क्यों न हो।

"हालांकि उनकी जीवन-यात्रा और शुरुआती संघर्षों को लेकर विभिन्न मीडिया रिपोर्टों में कुछ मतभेद भी देखने को मिलते हैं। उपलब्ध जानकारी अलग-अलग स्रोतों पर आधारित है, इसलिए उनके जीवन के कुछ पहलुओं के बारे में विवरण अलग-अलग रूप में सामने आते हैं।"

# खामेनींच्या बंकरपर्यंत इस्राईल पोहोचले कसे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी हे जमिनीखालील सुरक्षित बंकरमध्ये, अनेक स्तरांच्या सुरक्षेत राहत होते. जगाला वाटत होते, की त्यांना स्पर्श करणंही अशक्य आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे, की ज्या बंकरला इराण 'अभेद्य' समजत होते, त्या बंकरचा नकाशा इस्राएलच्या सर्व्हरवर वर्षानुवर्षे सेव्ह होता. हे एका रात्रीत केलेली 'गेम' नसते. यामागे २५ वर्षांचे सातत्य,अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक आणि तंत्रज्ञानाचा अचाट वापर होता.

२००१ मध्ये तत्कालीन इस्रायली पंतप्रधान एरियल शॅरॉन यांनी मोसादला एक स्पष्ट आदेश दिला होता. इराणला इस्राएलचे 'टार्गेट नंबर-१' बनवा. तेव्हापासून इराणच्या अण्वस्त्र वैज्ञानिकांच्या हत्या असोत किंवा लष्करी तळांवरील सायबर हल्ले,इस्राएलने सर्वत्र आपली पकड घट्ट केली होती. खामेनींना टार्गेट करणे हा या लांब पल्ल्याच्या धोरणाचा शेवटचा आणि सर्वात मोठा टप्पा होता.

फायनान्शिअल टाइम्स आणि सीएनएनच्या वृत्तानुसार, अमेरिकन आणि इस्रायली गुप्तचर यंत्रणांनी खामेनींच्या वेळापत्रकाचा अक्षरशः पिच्छा सोडला नव्हता. ते कधी उठतात, कोणाला भेटतात आणि कोणत्या मार्गाने प्रवास करतात, याचा प्रत्येक सेकंदाचा हिशोब ठेवला जात होता. हे काम केवळ माणसांनी नाही, तर कृत्रिम बुद्धिमत्तेने (एआय) केले.



तेहरानमधील ट्रॅफिक कॅमेऱ्यांचे जाळे हे या ऑपरेशनमधील सर्वात मोठे हत्यार ठरले. सूत्रांनुसार, शहरातील जवळपास सर्वच प्रमुख कॅमेरे हॅक करण्यात आले होते. या कॅमेऱ्यांमधून मिळणारा डेटा एन्क्रिप्ट करून थेट इस्राएलमधील सर्व्हरवर पाठवला जात होता. पाश्चर स्ट्रीटवर असलेल्या सरकारी कार्यालयांजवळील कॅमेऱ्याने सुरक्षा रक्षक गाड्या कुठे पार्क करतात आणि त्या परिसराची दैनंदिन हालचाल कशी असते, याची इत्थंभूत माहिती पुरवली.तेहरानमधील पाश्चर स्ट्रीटवर बसवलेला एक साधा ट्रॅफिक कॅमेरा तब्बल १० वर्षे इस्राएलच्या मोसादसाठी 'लाईव्ह फीड' पाठवत होता. याच कॅमेऱ्याने खामेनींच्या ताफ्यातील गाड्यांचा वेग, सुरक्षेची पद्धत आणि त्यांच्या बंकरचे प्रवेशद्वार जगासमोर उघड केले. एका साध्या लेन्सने इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या सुरक्षिततेचे सर्व दावे खोडून काढले.

केवळ कॅमेरेच नाही, तर मोबाईल नेटवर्कमध्येही इस्राएलने सुरुंग लावला होता. तेहरानमधील मोबाईल टॉवर्सच्या पायाभूत सुविधांमध्ये इस्रायली एजंट्सनी घुसखोरी केली होती. प्रत्यक्ष हल्ल्याच्या काही क्षण आधी, खामेनींच्या सुरक्षा पथकातील सदस्यांचे मोबाईल संपर्क तोडण्यासाठी विशिष्ट टॉवर्सची रेंज मुद्दाम विस्कळीत करण्यात आली. यामुळे सुरक्षारक्षकांना एकमेकांशी संवाद साधणे अशक्य झाले.

"आम्ही तेहरानला आमच्या जेरुसलेमसारखे ओळखतो," असे एका इस्रायली अधिकाऱ्याने दिलेले विधान या ऑपरेशनची व्याप्ती स्पष्ट करते. जेव्हा तुम्ही एखाद्या शहराला तुमच्या स्वतःच्या घराच्या गल्लीसारखे ओळखू लागता, तेव्हा तिथली एखादी साधी विसंगतीही तुमच्या नजरेतून सुटत नाही. खामेनींच्या बाबतीत नेमके हेच घडले.या संपूर्ण प्रक्रियेत 'युनिट ८२००' या इस्रायली गुप्तचर विभागाची भूमिका कळीची होती. त्यांनी अब्जावधी डेटा पॉइंट्सचे विश्लेषण केले. 'सोशल नेटवर्क ॲनॅलिसिस'चा वापर करून इराणच्या सत्ताकेंद्रातील निर्णय घेणाऱ्या व्यक्तींचा एक डिजिटल नकाशा तयार करण्यात आला. या नकाशाने हे स्पष्ट केले की, खामेनी नक्की कोणावर विश्वास ठेवतात आणि त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा सर्वात कमकुवत दुवा कोणता आहे.

इस्रायली लष्करी संस्कृतीत 'टार्गेटिंग इंटेलिजन्स'ला सर्वात महत्त्वाचे मानले जाते. निवृत्त ब्रिगेडियर जनरल इताई शापिरा यांच्या मते, जर देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने एखाद्याला संपवण्याचा निर्णय घेतला, तर गुप्तचर यंत्रणा त्याचे अचूक लोकेशन शोधून देण्यास बांधील असतात. ही एक प्रकारची 'टार्गेट फॅक्टरी' आहे, जिथे रोज नवीन माहितीचे विश्लेषण करून शत्रूचा पत्ता शोधला जातो. गेल्या वर्षी जूनमध्ये झालेल्या १२ दिवसांच्या युद्धाने या ताकदीची झलक दाखवली होती. त्यावेळी अवघ्या काही मिनिटांत इराणचे डझनभर अण्वस्त्र वैज्ञानिक आणि लष्करी अधिकारी एकामागून एक संपवण्यात आले होते. त्या मोहिमेतून मिळालेल्या आत्मविश्वासानेच खामेनींच्या बंकरपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा केला.


या ऑपरेशनमध्ये केवळ तंत्रज्ञान नव्हते, तर मोसादने रिक्रूट केलेले 'गुप्त खबरी' देखील होते. इराणच्या सुरक्षा यंत्रणेतील काही महत्त्वाच्या पदांवरील म्होरक्यांना मोसादने आपल्या जाळ्यात ओढले होते. या व्यक्तींकडून मिळणारी माहिती आणि सॅटेलाईट इमेजरी यांची सांगड घालून खामेनींचा अचूक ठावठिकाणा निश्चित करण्यात आला.

थोडक्यात खामेनींना संपवण्यासाठी इस्राएलने इराणच्याच यंत्रणेचा वापर त्यांच्याविरुद्ध केला. ज्या मोबाईल फोनला इराण प्रगतीचे साधन समजत होता, तोच फोन खामेनींच्या मृत्यूचे कारण ठरला. ज्या कॅमेऱ्यांनी जनतेवर लक्ष ठेवायचे होते, त्यांनीच इस्राएलला रस्ता दाखवला..इतकी प्रगत यंत्रणा असतानाही इराणला या धोक्याची पुसटशी कल्पनाही येऊ नये, हे आश्चर्यकारक आहे. पण जेव्हा तंत्रज्ञान आणि मानवी बुद्धिमत्ता यांचा असा संगम होतो, तेव्हा बंकरची खोली किंवा सुरक्षेचे जाळे फार काळ टिकू शकत नाही. इस्राएलने हे सिद्ध केले की, त्यांच्या नजरेतून सुटणे सध्याच्या काळात तरी अशक्यप्राय आहे.

खामेनींच्याया ऑपरेशनने जगासमोर एक मोठा प्रश्न उभा केला आहे. जर जगातील सर्वात सुरक्षित मानले जाणारे नेते अशा प्रकारे टार्गेट केले जाऊ शकतात, तर आधुनिक युद्धतंत्रात 'सुरक्षित' म्हणण्यासारखी कोणती जागा शिल्लक उरली आहे का? तंत्रज्ञानाच्या या महाजालात आता कोणीही अदृश्य राहिलेले नाही, हेच या घटनेचे सर्वांत मोठे वास्तव आहे.

# कथा केतकर वहिनींची!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गेल्या शतकाच्या सुरूवातीला स्त्री शिक्षणाची सुरूवात झाली. याच काळातील ही कथा आहे केतकर वहिनींची. मूळच्या मुंबईच्या वहिनी लग्नानंतर कोकणात गेल्या. जमिनीच्या वादामुळे त्यांच्या पतीचा खून झाला. मग सुरू झाली प्रतिकूल परिस्थिती आणि कायद्याची लढाई. त्या लढाईला पाठ न दाखविता यशस्वीपणे लढत-झगडत राहणाऱ्या केतकर वहिनींची कहाणी नक्की वाचायलाच हवी. सोबतच गेल्या शतकातील स्त्रीजीवन कसे होते हेही समजून घ्यायचे असेल तर त्याच पुस्तकातील ही कथा वाचा.

केतकर वहिनी बजू वहिनींची कथा सांगताना म्हणतात, की त्या अगदी नकळत्या वयाच्या असताना त्यांचा म्हणजे बजू वहिनींचा नवरा वारला होता. त्यांना त्याचा चेहराही आठवत नव्हता. त्या काळातील पद्धतीप्रमाणे त्यांना सोवळे करण्यात आले. अशा सोवळ्या बालविधवांना त्या काळी घरच्याच माणसांकडून वाईट प्रकारे वापरले जायचे. बजू वहिनींच्या बाबतीतही हेच घडले होते. दिवस राहिले. पोट पाडण्यासाठी ठावूक असलेले सगळे गावठी उपाय केले गेले. पण कशालाही दाद न देता तो चिवट गर्भ वाढत राहिला. असेच नऊ महिने भरले आणि कळा सुरू झाल्या. गावातील सुईण आली. तिने तिच्या पद्धतीने अट घातली. 'हे कुणाचे पाप? नाव सांगितले तरच सुटका करेन'. कोंडीत सापडलेल्या बजू वहिनींना निरूपायाने सासऱ्याचे नाव सांगावे लागले. सुईणीने सुटका केली. मुलगा झाला. रडलादेखील. त्यानंतर अशा परिस्थितीत नेहमी जे केले तेच केले. बाळाला बाजल्याच्या खुराखाली ठेवून बाळंतिणीला बाजल्यावर बसायला सांगितले.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# चैतन्य कानिफनाथांची मढीतील यात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान श्रीकृष्ण यांच्या आदेशाने नऊ नारायणांनी वेगवेगळ्या नाथांच्या रूपाने अवतार घेतले. सर्वप्रथम मच्छिंद्रनाथ हे नाथ संप्रदायचे आद्य प्रवर्तक मानले जातात. यामध्ये सर्वप्रथम महाराष्ट्रामध्ये गहिनिनाथांनी पाऊल टाकलेले आहे हे माहीत असूद्या. त्यातील प्रबुद्ध नारायनांनी (कानिफनाथांनी) हिमालयातील एका हत्तीच्या कानामध्ये जन्म घेतला. म्हणून त्यांना 'कानिफनाथ' असे म्हणतात.

चैतन्य कानिफनाथ महाराज हे नाशिकहून मढीला आले. त्यांच्या प्रवासामध्ये ते मिरी आणि तांबोलदेव या दोन ठिकाणी थांबले होते. तेथूनच पुढे त्यांनी मढीला येण्याचा प्रवास केला. नवनाथांप्रमाणेच कानिफनाथ महाराजांचा देखील मोठा शिष्य परिवार होता. ते त्यांच्यासमवेतच हा प्रवास करत होते.

कानिफनाथांचे मिरी येथील गावकऱ्यांच्या माहितीनुसार महाराजांचा येथे बारा वर्षे वास्तव्य होते. हे मंदिर मढी येथील चैतन्य कानिफनाथ मंदिरासारखेच आहे. येथे एक बारव आहे. मिरी येथील बारव ही बारव म्हणजे कानिफनाथांची अंघोळीची जागा होती, असे येथील लोक सांगतात. हे मंदिर मढीच्या मंदिराचीच प्रतिकृती करण्याचा ग्रामस्थांचा मानस आहे, असे येथील ग्रामस्थ सांगतात. जेव्हा कानिफनाथ महाराज नाशिकहून मढीकडे येत होते तेव्हा अहमदनगरमधील कापूरवाडी येथे पाच दिवस त्यांनी मुक्काम केला होता. त्यानंतर कानिफनाथ महाराज मिरी येथे आले. मग मिरीमध्ये त्यांनी जवळ-जवळ बारा वर्षे वास्तव्य केले. कानिफनाथ हे तांबडादेव (जवखेडे) परिसरात येथून पुढे कानिफनाथ महाराज तांबडादेव (तांबूळदेव) या परिसरात आले. तेथे नाथांनी विश्रांती घेतली. असे बोलले जाते की या ठिकाणी नाथांनी पान खाऊन थुंकले होते. म्हणून तेथे तांबडे झाले. म्हणून तेथे मंदिराला तांबडादेव मंदिर असे बोलले जाते. पुढे हे मंदिर मुस्लीम समाजाच्या ताब्यात गेले. त्यांनी या मंदिराचे नाव तांबूळदेव करून टाकले, असे बोलले जाते. तांबडा देव मंदिर जवखेडे येथे नाथांच्या घोड्याच्या टापा देखील आहेत. तांबडा देव मंदिर हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात जवखेडे या गावामध्ये आहे. कानिफनाथ महाराज येथूनच पुढे मढीला गेले.

नवनाथांच्या ग्रंथामध्ये असा उल्लेख आहे, की चैतन्य कानिफनाथ महाराजांना मुघल आक्रमणाबद्दल माहिती होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या समाधीची रचना मुघलांच्या पद्धतीप्रमाणे ठेवली होती, असे म्हणतात. त्यामुळे त्यांच्या समाधीला त्या काळी हानी पोहोचली नाही. पुढे नाथांच्या मंदिरावर मुस्लीम समाजाच्या लोकांनी अतिक्रमण करून त्यांची रचना बदलली व दर्गासारखी केली. कारण पूर्वी या मंदिराची ओळख तांबडादेव म्हणूनच होती. नंतर या लोकांनी तांबडादेवचा तांबोळदेव केले. आता तर या मंदिराचे नाव हजरत बाबा रमजान शाह दर्गा, असे केले आहे. या मंदिराला नाथांचा इतिहास आहे व या मंदिर परिसरामध्ये हिंदू मंदिरांचे स्तंभावशेष दिसतात. एवढेच नव्हे, तर या मंदिराच्या वरच्या बाजूची नकाशी ही मढीमधील कानिफनाथ महाराजांच्या मंदिराच्या नकाशीसारखेच आहे. तसेच या मंदिर परिसरामध्ये कब्रस्तान करून ठेवले आहे. या मंदिरामध्ये मुस्लीम पुजारी आहेत. हे मंदिर हिंदू लोकांच्या ताब्यात दिले जावे म्हणून येथील गावकरी प्रयत्न करीत आहेत.

मढीला भटक्यांची पंढरी, असेही बोलले जाते. त्याचे कारण असे, की मढीमध्ये सर्वांनाच समान मान-सन्मान दिला जातो. समाधी मंदिराच्या उत्तरेकडे ज्या पायऱ्या आहेत त्यांच्या तळाला एका



दगडावर एक प्राचीन लेख लिहिलेला आढळतो. मढी मंदिराच्या तळाला असलेल्या लेखात काय लिहिलेले आहे हे कळून येत नाही. तसेच आणखी एक लेख देखील मंदिरावर आहे. पण त्याची भाषाही यापेक्षा वेगळी आहे. जेव्हा कानिफनाथ महाराज मढीमध्ये आले तेव्हा ते पवनागिरी नदीकाठी आपेश्वर या महादेवाच्या मंदिरामध्ये समाधी लावून बसायचे. आपेश्वर मंदिर मढी येथील काही जाणकार सांगतात, की गुरू मच्छिंद्रनाथ देखील त्यांच्यासमवेत समाधी लावून बसायचे, कानिफनाथांचे जे शिष्य होते ते काही उत्सव असल्यास ढोल, ताशा, डफ यांसारखी वाद्ये वाजवत असत. त्यामुळे त्या वाद्यांच्या आवाजाने मच्छिंद्रनाथांच्या ध्यानसाधनेमध्ये व्यत्यय यायचा. तेव्हा त्यांनी कानिफनाथांना सांगितले, की मी वरच्या डोंगरावर जातो व तेथे ध्यानसाधना करतो, असे बोलले. या माहितीचा पुरावा कुठे मिळत नाही. नंतरच्या काळामध्ये कानिफनाथ महाराज हे मंदिरामधील गुफेमध्ये ध्यानसाधना करू लागले. चैतन्य कानिफनाथ महाराजांनी फाल्गुन वैद्य पंचमीला म्हणजेच रंगपंचमीला संजीवनी समाधी घेतली म्हणूनच रंगपंचमीच्या दिवशी येथे मोठी यात्रा भरते. दिवसभर येथे महाराष्ट्रासोबतच देशभरातून लाखो भाविक येतात. या दिवशी सर्वांना मंदिराच्या आतून दर्शन घेता येते. इतर दिवशी मात्र बाहेरूनच दर्शन घ्यावे लागते. पाडव्याच्या दिवशी दक्षिण गंगा म्हणजेच गोदावरी नदीवरून पाणी कावडीने पायी चालत आणले जाते. ते पाडव्याच्या पहाटे समाधीवर वाहिले जाते. म्हणजेच महाराजांना आंघोळ घातली जाते. यावेळी चंदनाचा लेप समाधीला लावला जातो, त्यासोबतच सुगंधीत द्रव्ये, अत्तर, फुले व वस्त्र अर्पण करून महाआरती केली जाते. हा सर्व सोहळा म्हणजेच पंढरपूरची आषाढी एकादशीसारखा देदीप्यमान असतो. रंगपंचमीपासून ते पाडव्यापर्यंत अनेक भक्त येथे झेंड्याची काठी घेऊन



येतात. मानाची काठी ही काठी मंदिराच्या कळसाला टेकविली जाते. पूर्वी या काठ्या आतमधील समाधीला टेकविल्या जायच्या. पण आता त्या मंदिरालाच टेकविल्या जातात. या दिवशी कळसावर रेवड्यांचा प्रसाद देखील उधळला जातो. समाधी मंदिराच्या दक्षिणेला दूरच्या डोंगरावर मच्छिंद्रनाथांचे संजीवन समाधी मंदिर दिसते. तसेच मंदिराच्या पश्चिमेला कानिफनाथ महाराजांचे ध्यान मंदिर आहे. ध्यान मंदिर मढी हे मंदिर खूपच रहस्यमयी आहे. या मंदिरामध्ये प्रवेश केल्यावर सर्वप्रथम येथे नंदीची मूर्ती आहे. त्यापाठोपाठ विठ्ठल आणि रखुमाई यांची मूर्ती आहे. मंदिरातील एक कोपऱ्यातून एक भुयार आहे. तेथून खाली जाणे खूपच कठीण आहे. त्यातून खाली गेल्यावर तेथे एक भगवान शंकराची पिंड आहे. येथेच कानिफनाथ महाराज ध्यानस्त बसायचे. तेथे पूर्णपणे अंधार आहे. त्यात पश्चिमेकडे एक छोटीसी खिडकी आहे. जिच्यातून रोज सायंकाळी सूर्यप्रकाश त्या पिंडीवर पडतो. येथील स्थानिक लोक असे सांगतात, की हे भुयार हे मच्छिंद्रनाथांना भेटण्यासाठी कानिफनाथ महाराज वापरत. परंतु सद्यःस्थितीत ते बंद आहे. कानिफनाथांची भक्त डाळिंबाई हे समाधी मंदिराच्या उत्तरेला एक डाळिंबाचे झाड व त्याखाली एक देवीची मूर्ती आहे. डाळिंबाई नावाची एक महिला नाथसंप्रदायाची दीक्षा घेण्यासाठी तिने कानिफनाथांची कठोर तपस्या केली व शेवटी कानिफनाथ महाराजांनी रंगपंचमीच्या दिवशी स्वतः प्रकट होऊन तिला दर्शन दिले. ते म्हणाले, की तुझ्याकडे जो मनोभावे इच्छा मागून धागा बांधेल त्याची इच्छा पूर्ण होईल. काही कालावधीनंतर या समाधीनजीक एक डाळिंबाचे झाड उगवले व त्या झाडाला लोक धागा बांधू लागले व त्यांच्या मनोकामना पूर्ण होऊ लागल्या.

जेव्हा शाहू महाराज पहिले मुघलांच्या वेढ्यामध्ये अडकले होते तेव्हा राणी येसूबाईंनी कानिफनाथांना नवस केला होता, की जर माझ्या शाहू महाराजांची सुटका पाच दिवसांच्या आतमध्ये केली तर कानिफनाथ गडाचा सभामंडप व नगारखाना हे मी बांधून देईल. तसेच देवाला पितळी घोडा अर्पण करेल. त्यानंतर शाहू महाराजांची सुटका ही पाच दिवसांच्या आत झाली. त्यानंतर राणी येसूबाईंनी चिमाजी सावंत यांना मढीला पाठवून प्रचंड असे प्रवेशद्वार, नगारखाना, सभामंडप इत्यादी बांधायला लावले. तसेच पिलाजी गायकवाड यांना देखील पितळी घोडा अर्पण करण्यास सांगितले. त्यासोबतच राणी येसूबाईंनी वैदिक पूजा व्हावी म्हणून वैदिक ब्राह्मण नियुक्त केले. यावेळी केलेल्या बांधकामासाठी गडाच्या पायथ्याशी एक मोठी बारव बांधली जी आजही येथे आहे. तिला गौतमी बारव असे म्हणतात. त्यातील पाण्याचा उपयोग गडावरील बांधकामासाठी केला होता. ही बारव ही अहिल्याबाई होळकर यांनी बांधली असल्याचेही काही गावकरी सांगतात.

## रंगपंचमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रंगपंचमी हा सण होळीचे शेवटचे पर्व मानले जाते. या दिवशी देवतांसह होळी खेळली जाते. हा सण दरवर्षी होळीनंतर शुक्ल पक्षाच्या पाचव्या दिवशी साजरा केला जातो. शास्त्रानुसार देवी-देवतांना समर्पित रंगपंचमीच्या या सणाला देव पंचमी असेही म्हणतात. या दिवशी देवी-देवता एकत्र होळी खेळतात तेव्हा सुख, समृद्धी आणि वैभवाचा आशीर्वाद देतात. या सणाच्या दिवशी घरोघरी खास पदार्थ बनविले जातात याला पुरणपोळी म्हणतात. रंगपंचमीचे महत्त्व लक्षात घेऊन आणखी एक नाव प्रचलित आहे, त्याला श्री पंचमी म्हणतात. या दिवशी देवतांसह रंग गुलाल खेळल्याने घरातील समृद्धी वाढते. रंगपंचमीच्या दिवशी रंग अंगाला लावला जात नाही, तर रंग हवेत उडविला जातो आणि रंग हवेत उडाला की तमोगुण आणि रजोगुणाचा नाश होतो. त्यांचा नाश झाल्यावर पुण्यशक्ती वाढते. प्राचीन काळी जेव्हा होळीचा सण अनेक दिवस साजरा केला जात असे तेव्हा रंगपंचमीचा दिवस हा होळीचा शेवटचा दिवस मानला जायचा आणि त्यानंतर रंग खेळले जात नाहीत. हा सण देशात अनेक ठिकाणी साजरा केला जात असला, तरी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये हा सण सर्वाधिक साजरा केला जातो. या दिवशी देवतांना रंग चढविले जातात आणि लक्ष्मीची पूजा केली जाते. पौराणिक कथेनुसार या दिवशी भगवान श्रीकृष्ण राधा राणीसोबत होळी खेळतात म्हणून या दिवशी श्रीकृष्ण आणि राधा राणीला रंग चढविला जातो.

रंगपंचमी संबंधी एक पौराणिक कथा आहे. असे मानले जाते, की होळाष्टकाच्या दिवशी जेव्हा भगवान शंकराने कामदेवाला जाळून राख केले होते तेव्हा संपूर्ण देवलोकात शोक पसरला होता. सर्व देवी-देवतांना चिंता वाटू लागली, की कामदेवाशिवाय जग कसे चालवायचे. त्यानंतर सर्वांनी भगवान शंकराची प्रार्थना केली. परमेश्वराने देवतांची प्रार्थना स्वीकारली आणि कामदेवाला पुन्हा जीवंत केले. असे केल्याने संपूर्ण देवलोकातील देवता प्रसन्न झाले आणि रंगोत्सव साजरा करू लागले. तेव्हापासून दरवर्षी फाल्गुन महिन्यातील कृष्ण पक्षातील पाचव्या दिवशी रंगपंचमीचा सण साजरा केला जातो.

# राशी मंत्र : अर्थ, महत्त्व आणि फायदे

**भाग-१**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंत्र म्हणजे शिकवणींचा एक संच आहे. जो अशा प्रकारे तयार आणि व्यवस्थित केला जातो, की जेव्हा त्याचे अचूक पठण केले जाते तेव्हा ते साधकाच्या आध्यात्मिक शक्तीमध्ये उपचारात्मक ऊर्जा केंद्रित करते. वेगवेगळ्या मंत्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची वारंवारता आढळू शकते. परिणामी विविध कारणांसाठी अनेक मंत्र आहेत, तसेच प्रत्येक मंत्राचे वेगवेगळे विभाग आहेत. वैदिक ज्योतिषशास्त्रात प्रत्येक राशीसाठी विशिष्ट देवतेनुसार मंत्रांचा संग्रह आहे.

### भारतीय जन्मकुंडलीनुसार १२ चंद्र राशी आहेत.

हिंदू धर्मात सूर्य राशींप्रमाणेच १२ चंद्र राशींचेही पालन केले जाते. चंद्र कॅलेंडर, जरी अनेक बाबतीत तुलनात्मक असले, तरी अधिक अचूक जन्मकुंडलीचे अंदाज प्रदान करते. प्रत्येक चंद्र राशी एका स्वामीद्वारे नियंत्रित केली जाते. जो ग्रहदेवता आहे. मंत्र ध्यानात राशी बीजमंत्राचा वापर केल्याने राशीच्या देवतेचे आवाहन करून तुम्ही सक्षम होऊ शकता. त्यासाठी तुम्हाला तुमची चंद्र राशी माहीत असणे आवश्यक आहे. कुंडली वाचून तुम्हाला ते समजण्यास मदत होऊ शकते. एकदा तुम्ही तुमची चंद्र राशी निश्चित केली, की तुम्ही त्याच्याशी जुळणारा राशी बीजमंत्र वापरण्यास सुरूवात करू शकता. त्यानंतर राशी बीजमंत्राचा वापर दररोज मंत्र ध्यान सुरू करण्यासाठी केला जाऊ शकतो. भारतीय ज्योतिषशास्त्रात राशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १२ चंद्र राशी आहेत.

### संस्कृतमध्ये राशीचा अर्थ 'चंद्र' असा होतो.

पाश्चात्य ज्योतिषशास्त्रात १२ सूर्य राशी असतात. त्या विपरीत राशीमध्ये १२ चंद्र राशी असतात. बीज मंत्र, ज्यांना बहुतेकदा बीज मंत्र म्हणून ओळखले जाते, ते ध्वनींचा संग्रह आहेत. राशी मंत्र हे मूलतः मूलभूत मंत्रांचे संक्षिप्त रूप आहेत. त्याऐवजी वापरल्या जाणाऱ्या पदांच्या आवश्यक ऊर्जा राशी मंत्रांमध्ये आढळतात. त्या राशीत जन्मलेल्या व्यक्तींसाठी, राशी मंत्र हे सर्व अडचणींवर एकच उपाय असू शकतात. हे सर्वांत मूलभूत मंत्र आहेत जे कोणत्याही परिस्थितीत वापरले जाऊ शकतात.

### राशी मंत्र : ते कशी मदत करतात?

राशी मंत्र कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणी म्हणता येतात. एखाद्या व्यक्तीने आपल्या दिवसाची सुरूवात आपल्या राशी मंत्राच्या जपाने केली पाहिजे. शेवट आपल्या राशी मंत्राच्या पठणाने केला पाहिजे. नवीन काम सुरू करण्यापूर्वी चाचण्या किंवा बैठकीपूर्वी आणि आजारपणात देखील ते म्हणता येतात. हे राशी मंत्र मूलतः 'बीज मंत्र' किंवा 'बीज मंत्र' आहेत. ज्यामध्ये कोणतीही चिंता, आजार, अडथळे, भ्रम इत्यादी दूर करण्याची अंतर्गत क्षमता असते. एकूण बारा चंद्र राशी आहेत. त्यापैकी प्रत्येक राशी एका विशिष्ट देवाद्वारे नियंत्रित केली जाते. प्रत्येक राशीच्या स्वामीशी एक विशिष्ट मंत्र जोडलेला असतो. स्वतःच्या राशी मंत्राचा जप केल्याने लवकर सकारात्मक परिणाम मिळतात. एकूण बारा चंद्र राशी आहेत. ज्या प्रत्येक राशीच्या स्वामीचे नियंत्रण असते. प्रत्येक राशीच्या स्वामीशी एक विशिष्ट मंत्र जोडलेला असतो. स्वतःच्या राशी मंत्राचा जप केल्याने लवकर सकारात्मक परिणाम मिळतात.

### राशी मंत्राचा जप कसा करावा

राशी मंत्रांचे पठण कधीही आणि कोणत्याही ठिकाणी करता येते. दिवसाची सुरूवात राशी मंत्राच्या जपाने करता येते. दिवसाचा शेवटही त्याच्याच जपाने करता येतो. नवीन उपक्रम सुरू करण्यापूर्वी चाचण्या किंवा बैठकींपूर्वी आजारी असताना किंवा स्थलांतर करताना देखील त्यांचे पठण केले जाऊ शकते. या राशी मंत्रांमध्ये चिंता, आजारपण, अडथळे, भ्रम इत्यादी दूर करण्याची नैसर्गिक क्षमता आहे. एकूण बारा चंद्र राशी आहेत. प्रत्येक राशीचा स्वामी वेगवेगळ्या स्वामींद्वारे नियंत्रित केला जातो. प्रत्येक राशीचा स्वामी एका विशिष्ट मंत्राशी जोडलेला असतो. स्वतःच्या राशी मंत्राचा जप केल्याने तत्काळ फायदे मिळतात. जो व्यक्ती दररोज आपल्या राशीचा मंत्र जप करतो त्याला ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. हे राशी मंत्र बहुतेकदा ११, १०८ किंवा १००८ वेळा पठण केले जातात.

### महत्त्वाचे राशी मंत्र

**१) मेष किंवा मेष राशीचा मंत्र**



मेष राशी बीज मंत्र हा मेष राशी किंवा आयर्स राशीखाली जन्मलेल्या व्यक्तींसाठी एक वेगळा आणि अद्वितीय मंत्र आहे. या मंत्राचा जप केल्याने तुम्हाला पैसे आणि समृद्धी आकर्षित करण्यास मदत होईल. हे परस्पर संबंधातील अडचणी दूर करण्यास मदत करेल. सर्व प्रकारच्या भीतीवर मात करण्यासाठी चांगले आहे. सर्व मेष राशींसाठी मेष राशी मंत्र खाली सूचीबद्ध आहे.

**मेष मंत्र असा आहे**
**ॐ ऐं क्लीं सौः।**
**ओम ऐंग क्लींग सौह**
**अर्थ :** ओम हा विश्वातील सर्वांत आध्यात्मिक ध्वनी असल्याचे म्हटले जाते. आयिम बीज मंत्र देवी सरस्वतीचे प्रतिनिधित्व करतो. क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाचे आवाहन आहे. सौह म्हणजे 'मी आहे' आणि मंत्राचा शेवट त्यावर होतो.

**मेष राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे**

मेष राशी मंत्र उपासकाचे कौशल्य आणि ज्ञान सुधारतो. वैदिक ज्योतिषशास्त्रातील हा मंत्र एखाद्याच्या नोकरीत उत्कृष्टता मिळविण्यास मदत करतो.हे एखाद्या व्यक्तीला नकारात्मकतेपासून सकारात्मकतेकडे समजून घेण्यास आणि एक आदर्श बदल करण्यास मदत करते. मेष मंत्र ज्ञानाच्या संचयनात मदत करतो. चांगल्या नैतिकतेसह चांगले व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मदत करतो. त्यासोबतच मेष मंत्र प्रेम करण्याची आणि प्रेम मिळविण्याची क्षमता वाढवितो.
मेष मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही
या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा

**मेष मंत्र कोण म्हणू शकतो?**

मेष राशीखाली जन्मलेले लोक पूर्व दिशेला तोंड करून हा मंत्र जप करा.

**२) वृषभ किंवा वृषभ राशीचा मंत्र**



हिंदू ज्योतिषशास्त्रानुसार वृषभ राशी ही १२ चंद्र राशींपैकी दुसरी आहे. हिंदीतील हा वृषभ राशी मंत्र एक बीज मंत्र आहे जो वृषभ राशीच्या व्यक्तीला येणाऱ्या कोणत्याही ज्योतिषीय समस्यांवर मात करण्यासाठी जपला जातो. दररोजच्या प्रार्थनेदरम्यान हा वाक्यांश वाचता येतो. हा मंत्र खूप फायदेशीर आहे आणि उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत करतो.

**वृषभ मंत्र असा आहे**
**ॐ ह्रीं क्लीं श्रीं ।**
**ओम ह्रींग क्लींग श्रींग**
अर्थ- ओम हा विश्वातील सर्वांत आकर्षक ध्वनी असल्याचे म्हटले जाते. ह्रीम बीज मंत्र हा देवी भुवनेश्वरीला प्रार्थना आहे, ज्याला महामाया असेही म्हणतात. क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाला आवाहन आहे. श्रीम बीज मंत्र धन आणि यशाची देवी महालक्ष्मीचा सन्मान करतो.

**वृषभ राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे**

वृषभ मंत्र कामाच्या ठिकाणी प्रभावीपणा वाढविण्यास मदत करतो. हे नेतृत्वगुण वाढविण्यास मदत करते. शिवाय, हा राशी मंत्र क्षमता आणि ज्ञान सुधारण्यास मदत करतो. हे करिष्माई व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मदत करते. तसेच ते एखाद्या व्यक्तीला भावनिकदृष्ट्या अधिक बुद्धिमान बनवते. शिवाय ते एखाद्याला संपत्ती आणि यश मिळविण्यात देखील मदत करते.

वृषभ राशी मंत्र पठण करण्याची उत्तम वेळ कधीही
या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा
वृषभ राशी मंत्राचा पाठ
वृषभ राशीखाली जन्मलेले लोक कोणत्याही दिशेला तोंड करून हा मंत्र जप करा.

**३) मिथुन किंवा मिथुन राशी बीज मंत्र**




हिंदू ज्योतिषशास्त्रातील बारा चंद्र राशींपैकी मिथुन राशी ही तिसरी राशी आहे. हिंदीतील हा मिथुन राशी मंत्र एक बीज मंत्र आहे जो व्यक्तीला येणाऱ्या कोणत्याही ज्योतिषीय अडचणींवर मात करण्यासाठी वापरला जातो. दररोजच्या प्रार्थनेदरम्यान हा मंत्र वाचता येतो. हा मंत्र खूप फायदेशीर आहे आणि हानी टाळण्यास, रोजगार मिळविण्यात आणि वैवाहिक अडचणी सोडवण्यास मदत करतो. मिथुन राशीखाली जन्मलेल्या लोकांनी हा मंत्र वाचला पाहिजे.

**मिथुन राशीचा मंत्र असा आहे**
**ॐ श्रीं ऐं सौः ।**
**ओम श्रींग ऐंग सौ**
**अर्थ-** ओम हा विश्वातील सर्वांत आकर्षक ध्वनी असल्याचे म्हटले जाते. हिंदू धर्मात ओम हा ध्वनी पवित्र मानला जातो. श्रीम बीज मंत्र धन आणि यशाची देवी महालक्ष्मीचा सन्मान करतो. आयम बीज मंत्र देवी सरस्वतीचे प्रतिनिधित्व करतो. सौ बीज मंत्राला हृदय बीज असेही म्हणतात.

**मिथुन राशी मंत्र जपण्याचे फायदे**

वैदिक ज्योतिषशास्त्रातील हा राशी मंत्र व्यवसाय आणि उद्योजकतेत यश मिळविण्यास मदत करतो.
हा मंत्र एखाद्या व्यक्तीला अधिक समजूतदार होण्यास मदत करतो.
यामुळे व्यक्तीच्या जीवनात नशीबही वाढते.
हा मंत्र व्यक्तीच्या जीवनात आनंद आणतो.
मिथुन राशीचा मंत्र उपासकाला त्यांच्या व्यावसायिक जीवनात समृद्ध होण्यास मदत करतो. मिथुन राशी मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा मिथुन राशीचा मंत्र कोणत्याही दिशेला मिथुन राशीखाली जन्मलेले लोक तोंड करून हा मंत्र जप करा.

**४) कर्क किंवा कर्क राशीचा मंत्र**



हिंदू ज्योतिषशास्त्रानुसार कर्क राशी ही बारा चंद्र राशींपैकी चौथी आहे. कर्क राशी मंत्र हा कर्क राशी किंवा कर्क राशीखाली जन्मलेल्या व्यक्तींसाठी एक विशिष्ट आणि विशेष मंत्र आहे. या मंत्राचा जप केल्याने तुम्हाला पैसे आणि आनंद आकर्षित करण्यास मदत होईल. वैवाहिक समस्यांचे निराकरण होण्यास मदत होईल आणि लवकर लग्नासाठी हे उत्तम आहे. कर्क राशीखाली जन्मलेल्या सर्वांसाठी कर्क राशी मंत्र येथे दिला आहे. हा मंत्र भक्तीने म्हणावा.

**कर्क राशीचा मंत्र असा आहे**
**ॐ ऐं क्लीं श्रीं ।**
**ओम ऐंग क्लींग श्रिंग**
**अर्थ-** ओम हा विश्वातील सर्वात आध्यात्मिक ध्वनी मानला जातो.
आयिम बीज मंत्र हा देवी सरस्वतीचा एक प्रकटीकरण आहे.
क्रीम बीज मंत्र भगवान श्रीकृष्णाला आवाहन करतो.
श्रीम बीज मंत्र हा धन आणि विपुलतेची देवी महालक्ष्मीला श्रद्धांजली आहे.

कर्क राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे चुकीच्या नवग्रह संरेखनामुळे येणाऱ्या सर्व अडचणींवर कर्क राशी मंत्र हा एक उत्तम उपाय आहे. ज्यांना ते ज्या व्यक्तीचे कौतुक करतात त्याच्याशी लग्न करायचे आहे त्यांच्यासाठी हे फायदेशीर आहे. शिवाय हा राशी मंत्र संपत्तीशी संबंधित सर्व चिंतांचे निराकरण करण्यास मदत करतो. हे घोषवाक्य शत्रूंचा पराभव करण्यास मदत करेल. ज्योतिषशास्त्रानुसार हा मंत्र कलाकारांसाठी देखील परिपूर्ण आहे. कर्क राशी मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा कर्क राशी मंत्र कर्क राशीच्या चिन्हाखाली जन्मलेले लोक कोणत्याही दिशेला तोंड करून हा मंत्र जप करा.

(क्रमशः)

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**